


म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. 2339
REFBK-0022114
REFBK-0022114

वि. क्र.
2339
22998
20/24/68
5104

# होरपळ

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
22998
दा. क.
काव्य 2339
संदर्भ शाखा (स्थळ)

भीमसेन देठे

REFBK-0022114
REFBK-0022114

आडोनी प्रकाशन

प्रथमावृती

६ डिसेंबर १९७७

(C) सौ. रंजना देठे

१८/१५४ सिद्धार्थ नगर नं. ५
गोरेगांव (प) मुंबई–४०० ०६२

प्रकाशक

श्री. जेकब डिसोझा, 'आडोनी' प्रकाशन आणि मुद्रण
२ री, पीरखान स्ट्रीट, मुंबई–४०० ००८.

# होरपळ

## भीमसेन देठे

मुद्रक

*भारत प्रिंटर्स ( बॉम्बे )*
शिवशक्ती,
बी. जी. खेर रोड, वरळी, मुंबई–१८

मुखपृष्ठ

**दत्ता टाककर**

किंमत ७ रुपये

हयातभर काखोटीला पाटी — खराटा घेऊन
जिने काबाडकष्टात माझ्या आयुष्याला घडवलं
त्या माझ्या आईस—

माझा हा पहिलाच काव्यसंग्रह प्रकाशित करण्यासाठी आडोनी ' प्रकाशनचे प्रकाशक व मुद्रक श्री. जेकब डिसोझा यांनी धाडस दाखवले त्याबद्दल त्यांना धन्यवाद द्यावेत तेवढे थोडेच आहेत.

'संबोधि' 'एक दुपार' या संस्थांनी मला कविता लिहिण्यास प्रोत्साहन दिले, तसेच कविता संग्रह रूपाने यावी म्हणून अनेकांचे हात लागले. त्यात प्रा. रमेश तेंडुलकर, प्र. श्री. नेरुरकर, दया पवार, प्रा. एन्. के. वेल्हेकर, प्रभाकर मांडे, किशोर खटनहार, बाळ हाटे, पुंडलिक जाधव, सौ. रंजना देठे व या संग्रहाचे मुखपृष्ठ बनवणारे माझे स्नेही दत्ता टाककर यांचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे.

या संग्रहातील बऱ्याचशा कवितांना अस्मितादर्श, निकाय प्रमेय, महाराष्ट्र टाईम्स, नवशक्ति, आयुध, माय मराठी इ० नियत कालिकांतून प्रसिद्धी देणाऱ्या संपादकांचा मी आभारी आहे.

—भिमसेन देठे

गेल्या वर्षी 'महाराष्ट्र टाईम्स' साठी कवितांची 'मासिक निवड' करत असताना शक्यतो नवनवीन कवींची रचना वाचकांच्या समोर यावी अशी माझी धडपड असायची. अनेक लहानमोठी मासिके मी या दृष्टीने धुंडाळत असे. त्याच निमित्ताने 'निकाय'च्या दिवाळी अंकात भीमसेन देठे या कवीची 'नाटक' ही कविता माझ्या वाचनात आली. त्या कवितेतला अस्वस्थ मनाची घालमेल चित्रीत करण्याचा प्रयत्न मला परिणामकारक वाटला. मी ती कविता 'महाराष्ट्र टाईम्स'च्या निवडीसाठी घेतली. ती निवड प्रसिद्ध झाल्यावर थोड्याच दिवसांनी श्री. भीमसेन देठे, आपली कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी (वास्तविक त्याची काही गरज नव्हती) मला भेटले आणि बोलता बोलता पूर्वीचे सिद्धार्थ महाविद्यालयातील ते माझे विद्यार्थी असल्याचे व त्यांची एक कविता मी त्या कॉलेजच्या वार्षिकात प्रसिद्ध केल्याचे त्यांनी मला सांगितले. मी ते विसरलो होतो पण त्याचे स्मरण हा मला एक सुखद अनुभव वाटला. त्यांची काव्यसाधना जाणून घेण्याची जिज्ञासा माझ्या मनात उत्पन्न झाली आणि ती जाणून घेतल्यानंतर माझा आनंद खरोखर दुणावला.

देठे सांगू लागले, 'कॉलेजमध्ये असतानाच मला काव्य लेखनाची गोडी लागली. पाडगावकरांच्या धुंद, गोड कवितांचे अनुकरण करीत मीही शब्द जुळवू लागलो.:

**—हातात हात तुझा असाच हा असावा**
**नभात चंद्रमा तो डोक्यावरी झुलावा**
**— — — — — — — — — —**

**—दूर क्षितिजाच्या कडेला**
**प्रकाशाचा कवडसा**
**दावतो मला आडोसा**
**— — — — — — — — —**

एक

—दवबिंदू पाकळ्यांचे
का अश्रु पापण्यांचे ?
माझे मला कळेना
का सूर भावनांचे ?

अशा तऱ्हेने अनुकरण करणाऱ्या खूप कविता मी त्या काळात लिहिल्या परंतु हळूहळू लक्षात आले की हे जग 'माझे' नाही, हे सारे उसने 'शब्द—जाल' आहे...माझे काव्य लेखन मंदावले... नंतर दलित साहित्याचा प्रवाह उगम पावला...दया पवार इत्यादी कवींच्या सान्निध्यात आलो...वाटलं या प्रवाहात माझं जग मला सापडतं आहे. माझी कविता पुन्हा जागी झाली. मात्र ती आता गाऊ लागली 'विद्रोहाचे श्वास...'

देठे यांचे हे प्रांजल आत्मकथन मला महत्त्वाचे वाटते. कोणताही कवी प्रारंभी अनुकरणाच्या अवस्थेतून जातोच. सुदैवाने एका चांगल्या कवीचा संस्कार त्यांच्या कवितेवर झालेला असल्यामुळे त्यांच्या अनुभवांचे जग वेगळे असले तरी हा संस्कार त्यांच्या कवितेला उपकारकच ठरेल—नव्हे ठरत आहेही. ही अनुकरणाची अवस्था प्रारंभी जितकी स्वाभाविक असते तितकीच ती लौकरच ओलांडून जाणेही कवीच्या विकासाला आवश्यक असते. देठे यांना हेही भान वेळीच आले व त्यामुळे त्यांच्या प्रगतीच्या दिशाही त्यांना मोकळ्या झाल्या.

गेल्या १०/१५ वर्षांत मराठी साहित्यात निर्माण झालेला दलित साहित्याचा प्रवाह ही आपल्या सांस्कृतिक आणि वाङ्मयीन क्षेत्रातील महत्वाची घटना आहे. शतकानुशतके नाकारलेले— अक्षरशः गावकुसाबाहेरचे जीवन जगणारांच्या कुडीमध्ये परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने नवा प्राण फुंकला गेला आहे. त्यांनी 'न'कारातच आपले बळ शोधावे हे स्वाभाविक आहे,

त्यांचा हा विद्रोह आणि त्याचा वाङ्मयीन उद्रेक हा एक तऱ्हेचा कॅथॉर्सिस आहे. या संस्कृतीत जे भयाण शोकात्म जीवन त्यांच्या वाट्याला आले त्याचा हा अपरिहार्य परिणाम आहे. ज्वालामुखीचा उद्रेक हीं भयानक घटना असली तरी त्या लाव्हारसामुळे जमिनीचा कस आणि सुपीकपणा वाढतो त्याप्रमाणे या विद्रोहाच्या उद्रेकाने मराठी भाषेचा कस नव्याने वाढेल, तिचे अनुभवक्षेत्र अधिक समृद्ध होईल, तिची क्षितिजे नव्याने विस्तारतील असेच मला वाटते. राजा ढाले, केशव मेश्राम, नामदेव ढसाळ, ज. वि. पवार, दया पवार, अर्जून डांगळे इत्यादी कवींनी विविध अंगानी वैशिष्ठ्यपूर्ण केलेल्या या दलित साहित्याच्या प्रवाहातच भीमसेन देठे यांची कविता आज आपले स्वाभाविक रंगरूप धारण करीत आहे. ही कविता आपले इमान जपण्याची शिकस्त करीत आहे.

**माझ्या इमानी शब्दांनो!**

**झकपक चांदण्यात मिरवू नका**
**ह्या गुलाबांचा वास**
**तुम्हाला येणार नाही रे**

**अश्रुंच्या थेंबामध्ये**
**भरा पेटलेले निखारे**

अशी वास्तव जाणीव ती आपल्या शब्दांना करून देते. या मनाला 'झकपक चांदण्याची' 'गुलाबांच्या वासाची' ओढ आहे आणि त्या बरोबरच ते चांदणे आपल्या जगापासून फार दूर आहे याचीही मनाला घालमेल देणारी तीव्र जाणीव आहे. हा विरोध आणि ही घालमेल यातूनच त्यांची कविता जन्माला आली आहे व तिने निरनिराळी रुपे धारण केली आहेत. त्यांची आईच पहा ना... काखोटीला पाटी, खराटा मारून गावकुसाबाहेरच्या जगाची 'आर-

शासारखी लख्ख झाडलोट' ती करत असली तरी ती परत येते ती 'घामजलेली' अंगभर कचरा घेऊन' कविमन विव्हळून म्हणतेः

**झगमग चांदण्यात**
**तुला न्हाताच आलं नाही**
**दगड धोंड्यांनी सजलेली**
**कचऱ्यातच वावरलीस**

पाचोळा, पडझड, चिरगुटं यात आयुष्य गुरफटलेल्या आईचं हसणं ही कल्पनादेखील त्यामुळे कवीला सहन होत नाही, इतकं दु:ख हा त्या जिण्याचा त्याला स्थायीभाव वाटतो.

**हे माझे आई !**
**तू अशी उसनवारी हासू नकोस ग**
**तुझं रडणंच मला आवडतं**
**ज्यात पेटवीत असतेस हिरोशिमा—**

मुकादमाच्या हुकुमाखातर 'फक्कडशी लावणी' गाणाऱ्या बापाला खरं गायचं असतं 'भाकरीचं गाणं' पण ते त्याला कधीच गाता येत नाही. ही केवळ गरिबी नव्हे. या दु:खाची डागणी कोणत्या प्रकारची आहे ते त्या कविता प्रत्यक्ष वाचतानाच लक्षात येते.

मनाला या डागणीची जाणीव झाल्यामुळे कवीची भाषा अनेकदा आक्रमक बनते. 'कुदळीने आभाळ फोडायची' कल्पना मांडू लागते,

**...आम्ही पचकन थुकलेल्या थुंकीला**
**हासडलेल्या अर्वाच्य शिवीला**
**इतिहासात फार मोठा अर्थ आहे...**

असं प्रतिष्ठित जगाला त्वेषाने आव्हान देऊ लागते. या जगाच्या गावकुसाबाहेरच्या चंद्रावर झालेला अत्याचार आणि अब्रुसाठी तिने

घेतलेला विहिरीचा आश्रय या एकाद घटनेत कवीला अनेक अत्याचारांचे संदर्भ जाणवतात:

**...चंद्रा तू ठरलीस या विसाव्या शतकातील**
**वासनाकांडाची भोगवस्तू—**
**गवई बंधूंच्या डोळ्यातली वेदना —**
**किलावेनमानातील भयंकर रात्र—**
**ब्रांह्मण गावातील एक नागवी यात्रा—**
**नारनवरेचा तडफणारा प्राण—**
**भागवत जाधवच्या मेंदूचा चेंदामेंदा !...**

आणि या अशा जगातला माणुसकीलाच नागवला गेलेला एखादा आत्मा त्यांच्या कवितेत:

**बरं झालं तेही, मी षंढ नाही तर**
**विसरलो होतो नागव्यापणात दिसणारं माझं लिंग**
**मला स्खलित व्हायचंय नि भोगायचंय**
**मला नागवणाऱ्या संस्कृतीच्या ठेकेदारीला**

अशी भयानक सूडाची भाषा बोलू लागतो.

पण ही सूडाची भाषा ही केवळ एक तात्कालिक प्रतिक्रिया असते. हे कविमन मुळात तसे ऋजू आहे. खरं तर ते 'जीवन निष्ठांचा निवारा' शोधत आहे. त्यासाठी तर त्याची सारी तडफड आहे ('हे देशा')

'आणि तुम्ही समजावून घ्या—

आमचा संघर्ष अराजक माजविण्यासाठी नव्हे.

अशा आर्त वाणीने, जगाने आपणास समजावून घ्यावे, अशी रास्त अपेक्षा ते मन करते आहे'. (आमचा संघर्ष)

खरं म्हणजे या जगण्याला विचित्र शाप आहेत. शिक्षणामुळे सुधारणेमुळे प्रश्न सरळ सोपे न बनता उलट अधिकच गुंतागुंतीचे

आणि भावनांच्या जगात विचित्र घालमेल उत्पन्न करणारे झाले आहेत. चांदण्यामधल्या वाळूत, धुंद मिठीत असणाऱ्या कुणा विमल जोशीला आपल्या प्रियकराची 'जात' समजताच तिच्या देहाखालची वाळू सरकते आणि 'आपलं कुणा सांगू नकोस' ह्या तिच्या शब्दांनी गंध सुकून भिरभिरणारा पाचोळा एक झंझावात होतो—एका बाजूला हा अनुभव तर दुसऱ्या बाजूला ह्या बामणी पोषाखामुळे जिगरदोस्त शिरप्या परका होतो–त्याच्याशी खूप बोलायचंय, बेंबीच्या देठापासून हसायचंय पण तो परका होतो...अशा वेळी भोवतालचं वाट्याला आलेलं नवं जीवनच किती खोटे, नकली, नाटकी आहे असं वाटू लागतं...'नाटक' या कवितेतला अंतःकरणाचा तडफडाट या दृष्टीने पाहण्यासारखा आहे. सगळे विलासच शाप वाटू लागतात. 'मला हे नाटक जमणार नाही' असे जिवाच्या आकांताने त्या मनाला ओरडून सांगावेसे वाटते. निव्वळ आक्रस्ताळी जाणिवांहून किती निराळे अनुभव टिपण्याचा प्रयत्न करीत आहे त्याची कल्पना यामुळे येईल.

कवीला निसर्गाची ओढ आहे पण हे निसर्गाचे दानही मुक्तपणाने स्वीकारता येण्याची समर्थता त्याच्या जगाला नाही, याची यातना देणारी जाणीव कवीला आहे. 'पावसा' या कवितेत ही खंत किती तीव्र आणि तितक्याच कोमल शब्दात प्रगट झाली आहे:

**पावसा तू आलास**
**तुझ्या येण्यानं**
**फुलून गेला**
**इथला प्रत्येक अणुरेणू**
**स्वागत केलं तुझं**
**गवताच्या पात्यांनी**

झाडांनी फुलानी
नद्या नाल्यांनी
समुद्राच्या लाटांनी
हरित क्रांतीच्या चमकणाऱ्या स्वप्नांनी
ये पावसा......

असं भरल्या मनानं पावसाचं स्वागत केल्यानंतर कवी हळूच विश्वासात घेऊन त्याच्यापुढे आपल्या जगाचे दैन्य उघडे करतो— या जगाला पावसामुळे कसा निराधारपणा येणार आहे ते हळुवार-पणे कथन करतो व शेवटी म्हणतो—

तुला येऊ नको
असं तरी कसं म्हणू ?
तुझ्या येण्यानं जर
लाखो फुलत असतील--
-आम्ही तर पावलागणिक
चिरडणारे किडामुंगी
सगळेच ऋतु
आमचा स्वाहा
करण्यास टपलेले
पावसा !
माफ कर बाबा
आमच्या बसक्या घरातील
बसक्या माणसांना
तुझं स्वागत
करता येत नाही रे ! (पावसा)

किती हृदयस्पर्शी झाले आहे हे साधेसेच चित्रण.

ढग गडगडाट करू लागले की आकाशात म्हातारी हरभरे दळतेय हे आपण नेहमीच लहानपणी ऐकलंय. पण हा कवी मात्र म्हातारीच जातं जे दळण दळताना पाहतो ते किती विकट, हृदय पळवटून टाकणारं दळण आहे पहा,

**फाटलेल्या छप्पराचं...बेवारशी प्रेताचं**
**सडलेल्या बोटांचं...रिकाम्या पोटाचं**
**डोळ्यांच्या खाचांचं**
**दगडाला वाहिलेल्या रक्ताचं**
**गळणाऱ्या घामाचं...लुटलेल्या अब्रुचं**
**दुबळ्या जिवाचं...कण्हलेल्या मरणाचं...(म्हातारीचं जातं**

मनाची घुसमट, घालमेल, होरपळ या जाणिवांनाच त्यांच्या कवितेत अशा रीतीने प्राधान्य आहे.

त्या दिवशी आमच्या कॉलेजात कवीबरोबर या कवितांसंबंधी बोलत असताना शेजारीच, संस्कृत विषय शिकविणारे माझे स्नेही प्रा. अरुण कुळकर्णी बसले होते, ते चटकन मध्येच म्हणाले 'तुम्ही बोलता आहात त्यावरून 'होरपळ' हे नाव या काव्यसंग्रहाला अन्वर्थक ठरेल' आणि काव्यसंग्रहाचे नामाभिधान तेथेच झाले.

या काव्यसंग्रहातील 'फोडायचंय आभाळाला' 'गटार उपसणारा माणूस 'गाणं' 'पावसा' 'म्हातारीचं जातं' 'नाटक' या रचना कविता म्हणून मला विशेष महत्वाच्या वाटतात. या कविता लिहिणाऱ्या कवीचा भविष्यकाळ निश्चित उज्वल आहे. त्याला माझ्या मनोमन शुभेच्छा !

**प्रा. रमेश तेंडुलकर**

# अनुक्रम—


माझ्या इमानी शब्दांनो १
फोडायचंय आभाळाला ३
गटार उपसणारा माणूस ५
स्वयंभू ७
हे देशा ९
गाणं ११
तुम्हाला आठवतं का १२
प्रयोग करणाऱ्या कुत्र्यांना १३
पावसा १५
नागडा १७
आमचा संघर्ष २०
वेडी हरिणी २२
जळण २३
जात २४
घुसमट २८
सावधान २९
उध्वस्त ३०
तुम्ही ३१
यशोधरेस ३२
गर्भ ३४
चंद्रा तू ३५
सूर्य गहाण पडलाय ३९
म्हातारीचं जातं ४०
येऊ नकोस पुन्हा ४१
होरपळणारी वस्ती ४२
ठिगळ ४४
पैलतीरावरील शिरपा ४५
हे थांबवायला हवं ४७
मला जगायचंय ४९
शोध ५०
नाटक ५१
स्वीकार ५३
सागरा प्राण तळमळला ५५
विद्रोहाचे श्वास ५७

# माझ्या इमानी शब्दांनो

माझ्या इमानी शब्दांनो !
असे गोंधळू नका
झकपक चांदण्यात मिरवू नका–
ह्या गुलाबांचा वास
तुम्हाला येणार नाही रे....
संगमरवरी नक्षीदार उपाहारगृहे
तुमच्यासाठी बंद आहेत
रंगी बेरंगी मोटारी
तुम्ही फक्त बघायच्याच
झगमगलेल्या पॉश
निर्जीव सापळयात
तुमचे नागडे मन
घुसडू नका–

जन्मभर वेदनांतच आंघोळलात
...ही वस्ती,
तुमच्या जिवाभावाची
घुमलेले चित्कार
किंचाळलेल्या हाका
अमानुषतेच्या दाहाने
अश्रू असे गाळू नका
अश्रूंच्या थेंबांमध्ये
भरा पेटलेले निखारे—
स्वर तुमचे पोरके रे
तुम्हीच त्यांना गोंजारा
जाणिवांच्या क्षीतीजावर
रक्तचित्र रेखाटा
अंधार विझत चाललाय
रातकिड्यांची किरकीर थांबली
घुकेही वितळू लागले
होणारी पहाट तुमचीच आहे !
—हे माझ्या इमानी शब्दांनो,
उगवणाऱ्या सूर्याला
कवेत घेण्यास
सज्ज व्हा !

हे माझे आई !
काखोटीला पाटी-खराटा मारून
लगबगीने शिरतेस गावात
आरशासारखी लख्ख झाडलोट करतेस
गावकुसा बाहेरच्या परतीच्या वाटेवर
घामेजलेली धावपळ तुझी
अंगभर कचरा घेऊन येते
झगमग चांदण्यात
तुला न्हाताच आलं नाही
दगडधोंड्यांनी सजलेली
कचऱ्यातच वावरलीस
डोहातल्या पाचोळयाची

पडझडलेली वस्तीही
तुझ्यासारखीच
चिरगुटांत गुरफटून बसलेली
हा प्रकाशणारा सूर्य
तुझ्या, माझ्या ह्या वस्तीच्या
वाटेवर कधीच प्रकाशत नाही
कदाचित तोही शिकला असावा
ह्या देशाच्या संस्कृतीच्या
वर्णव्यवस्थेचे धडे
हे माझे आई !
तू अशी उसनवारी हासू नकोस ग
तुझं रडणंच मला आवडतं
ज्यात पेटवीत असतेस हिरोशिमा
हे माझे आई !
तुझ्या पाटी-खराट्याचा वारसा
माझ्या नावावर नोंदवू नकोस ग
मला तू जन्म दिलास ना
तसंच दुसरं काही
करायचं असेल—
तर माझ्या हातात
कुदळ दे—
मला फोडायचंय
ह्या आभाळाला !

●

# गटार उपसणारा माणूस

गटार उपसणारा एक माणूस
मळभलेल्या ढगांना उराशी धरतो
त्याच्या हातातील बरबटलेले फावडे
खर्‌र्‌र...खर्‌र्‌र...करून किंचाळते
खोलगटलेल्या गालफडावरील
चिरगुटलेलं गवत
घोंगावणाऱ्या माशांशी
दीनवाणी झगडत राहते
हातापायांच्या सळया गटारांचे गज बनून
तो हवेसारखा झेपावत
झोकावून घेतो स्वतःला
पाठी पोटी एक झालेली

अंतर्बाह्य डबडबलेली
एक कमानदार लकेर
तळपणाऱ्या उन्हात
चमचम करते
गडबड गोंधळ
रंगीबेरंगी वाहनांनी
फुलून गेलेला रस्ता
त्याला पाठमोराच दिसतो
तो आंधळा असावा की बहिरा ?
कदाचित त्याला आवाजही नसावा
किती शांत गंभीर
स्थीतप्रज्ञासारखा
ढवळीत आहे गढूळ पाण्याचे रसायन

●

## स्वयंभू

तुम्ही खुशाल वाजवा नगारे
त्याची आम्हाला पर्वा नाही
शतकानुशतके दडपला तरी
आवाज आमचा स्वयंभू आहे
आमच्या गाण्याच्या प्रत्येक शब्दाला
रक्ताचा आकार आहे
हरएक सूर कफन लेवूनच
उमटत असतो
संस्कृतीच्या रिव्हॉल्वरमधून
सुटणाऱ्या तुमच्या गोळ्या
फुसक्या आहेत याची जाण
तुम्हाला येणार तरी केव्हा ?

तुम्ही मांडलेल्या लबाड—
कोल्हेकुई थिसेस
आम्ही चांगल्या
समजू शकतो—
अरे गिधाडांनो
इवलासा चांदवा आम्हाला दाखवता
हे विशाल आकाश तर
आमचंच आहे
याला रंग भरणारा
सूर्यही आमचाच होता ना?
आम्ही पचकन थुंकलेल्या थुंकीला
हासडलेल्या अर्वाच्य शिवीला
इतिहासात फार मोठा अर्थ आहे
ह्याचा विचार
ह्या विसाव्या शतकातील
तुमचं सृजनशील मन
करू शकेल काय?

●

## हे देशा

यंत्राशी झटं खेळणारा
लोखंडानी ऊर बडविणारा
डोक्यावर आग वाहणारा
विजांचे लोळ होतात ज्यांची हाडे
मणक्यांच्या सळया करणारे
घाम ओकणाऱ्या हातांना
पोटाच्या खड्यांना
आटणाऱ्या रक्ताला
उसवणाऱ्या पापण्यात
रूतणाऱ्या आसवांना
मिळणार असेल
जीवन निष्ठांचा निवारा
भूमिहीन बेघरांना
जीवनमानाचा तुकडा

बेकारांना आकार
खचलेल्या पिचलेल्यांना
छोटासा कवडसा
—मिटणार असेल......
धुमसणारी आग-
काळ्या पैशात मिरवणारी-
भांडवलदारांची मिरासदारी-
शोषितांचे शोषण-
दुबळ्यांचा कर्जाचा डोंगर-
दाबलेले हुंदके-
कढणारे श्वास-
जातीयतेच्या गांधीलमाशा-
अमानुषतेचा दाह !
—तरच हे देशा,
तुला
मी
माझा देश
म्हणू शकेन !

# गाणं

डोक्यावर दगड वाहताना
झुपकेदार मिशांना पीळ देत
मुकादम म्हणायचा
'अरे किस्न्या, होऊन जाऊ दे
फक्कडशी लावणी
गोंदलेल्या गळ्यातून माझा बाप गायाचा
ज्यात असायचे
चंद्र, सूर्य, फुलणारी फुले
समुद्राच्या लाटा
इष्काच्या कैफात डंवरलेली एक
मस्तवाल छोकरी...
घाम ओकणारे हात
टाळ्या पिटीत वाहवा करायचे
भारावलेला माझा बाप
रस्त्यानं चालताना
चाचपडायचा भाकरीचं गाणं
जे त्याला कधीच गाता आलं नाही

## तुम्हाला आठवतं का !

तुम्हाला आठवतं का
आपल्या मुठीत
सामावलं होतं आकाश
चैत्यभूमीवर बाबांचा शेवटचा निरोप घेताना
पाठ फिरवलीत तुम्ही
त्या भडकणाऱ्या ज्वालेकडे
जवळ असलेल्या समुद्रात
फेकून दिल्यात आणाभाका
आपल्या डोळ्यांनी पाहिलेली
तरंगणारी स्वप्ने
समुद्राच्या लाटांसारखी
फुटून पांगू लागली
उगवणाऱ्या रोपट्यांनाही
छाटू लागलात-
आपल्याला
फोडायचं होतं
डोंगराला
आपण आपल्यालाच
फोडीत बसलो
ह्या आकाशाला
धरण्यासाठी
कुणीतरी 'बाबा' होणं
अपरिहार्य आहे !

●

प्रयोग करणाऱ्या कुत्र्यांना-

कालपरत्वे मॅच्युअर झालेली कुत्री
संभोगात बुडून जातात
प्रत्येक मोसमात नवेनवे प्रयोग करू
पाहतात
त्यांचे संशोधनात्मक स्त्रवण
पसरू लागते गोल फिरणाऱ्या खुर्ची भोवती
धावणाऱ्या फियाट बरोबर
टुमदार बंगल्यावर.

त्यांच्या सृजनशील मनाला
विसर पडतो रक्त ओकून मरणाऱ्या बापाचा,
त्याच्या ताठ मिशांचा,
त्याने बुटाच्या ठोकरीने उडविलेल्या,
मुलायम धुळीचा;
हाकारलेल्या आर्त हाकांचा !
तुमच्या सलाम ठोकणाऱ्या हातांना
लूत भरणारच आहे;
तुम्ही पिसाटलेल्या मनाने
पिसाळणारच.
हे सारं काही जमेस धरून
तुम्हाला 'हाडूक' टाकणारेच
तुम्हाला हाकलण्यासाठी
हातात दगडी, काठ्या घेऊन
बसले आहेत,
याची खात्री करून द्या.

पावसा–

पावसा तू आलास
तुझ्या येण्यानं
फुलून गेला
इथला प्रत्येक अणु रेणू
स्वागत केलं तुझं
गवताच्या पात्यांनी
झाडांनी, फुलांनी
नद्या नाल्यांनी
समुद्राच्या लाटांनी
हरित क्रांतीच्या
चमकणाऱ्या स्वप्नांनी
ये पावसा,
तू जरा जवळ ये
तुझ्या कानात सांगतो
आम्ही बसक्या घरातील
बसकी माणसं
तुझ्या येण्यानं
साफ कोसळून
विस्कळीत झालोय रे
तू दाणादाण करीत

कोसळलास
फाटलेल्या छप्परातून
फुटलेल्या कौलांतून
तुटलेल्या पत्र्यातून
चटईच्या भिंती
पडू लागल्यात
चिखलात रुतलेले
म्हातारे-दुखणरू
चिमुकली पोरं
बघ कशी असह्यतेने
हंबरतात....
तुला येऊ नको
असं तरी कसं म्हणू ?
तुझ्या येण्याने जर
लाखो फुलत असतील-
—आम्ही तर पावलागणिक
चिरडणारे किडा-मुंगी-
सगळेच ऋतु
आमचा स्वाहा
करण्यास टपलेले
पावसा !
माफ कर बाबा-
आम्हा बसक्या घरातील
बसक्या माणसांना
तुझं स्वागत
करता येत नाही रे !

काळा अंधार चिडीचूप
स्थिरावलेली काळी सावली
पिंजारलेले केस-दाढी
संगमरवरी पुतळ्यासारखा दारामध्ये उभा असतो.
" जातो रे मी "
शेवटचा निरोप घेतल्यासारखा
गद्गदणारा स्वर
"तुरुंगातून सुटतोस काय !
चार दिवसात परतीची भाषा ?"
लाल लाल डोळ्यातून
ठिणगी सारखे उडालेले अश्रु
"कंटाळा आला रे ह्या जगण्याचा

भीक मागता येत नाही
थुंकी झेलता येत नाही
पोट काही थांबत नाही
टाचा घासल्या रक्तबंबाळ होईपर्यंत
ठोठावले दरवाजे अनेकांचे
कपाळावरचा तुरुंग बघून
भिकाऱ्यागत हुसकावलं
तुरुंग ! तुरुंग !! तुरुंग !!!
का भोगला तुरुंग ?
बळजबरीने इनामदाराने
भोगलेल्या माझ्या बहिणीचा
जाब विचारला –
म्हणून तुरुंग ?
गाव कुसाबाहेरच्या तुरुंगानंतर
सुरू झाला हा तुरुंग
अन्यायाच्या विरुद्ध भाष्य करणारा
चोर, डाकू, दरोडेखोर ठरतो–
वारे इमानदार देशाची इमानदार व्यवस्था !
ह्या देशात जन्माला आलो हेच मोठे पाप–
कुणाचे ?
माझे की आई-बापाचे ?

का भोगली त्यांनी ती संभोगाची रात्र ?
पीक जळणार होतं
तर का पेरावं बी माझ्या बापानं ?
आईने तरी का भोगावी
नऊ महिन्याची सजा—
तिच्या रक्तवाहिन्यांनी तरी
का पुरवावं रक्त ह्या गोळयाला ?
लक्तरे सावरून जगणाऱ्या माझी
लक्तरेही फाडून घ्यावी त्यांनी ?
मला नागवा केला रे
बरं झालं तेही–मी षंढ नाही तर
विसरलो होतो नागवेपणात दिसणारं माझं लिंग
मला स्खलित व्हायचंय नि भोगायचंय
मला नागवणाऱ्या संस्कृतीच्या ठेकेदारीला–
जातो मी !''
दमदार पावले टाकीत आला तसा चालू लागला—
त्याच्या पुढं पळत होता
पेटलेला, काळा—चिडीचूप अंधार

●

## आमचा संघर्ष

तुम्ही समजावून द्या
आमचा संघर्ष अराजक माजविण्यासाठी नव्हे
मध्यंतरी भिंती उभारून
इथल्या वस्त्यांना तुम्ही बंदिस्त करून टाकलंत
दुःख, दैन्य, दारिद्र्यानं पिळून काढलंत
विटंबना, अत्याचार, बलात्कार, जाळपोळीने
आमच्या पिढयान पिढया चिरडून काढल्यात
आज रोमारोमांत धगधगणारी आग
घेऊन आम्ही उधाणलो आहोत.
गावकुसाच्या भिंती तोडण्यासाठी
आम्ही बंडखोर बनलो आहोत
कोड फुटलेल्या वर्णभेदी संस्कृतीची
हिंस्त्र श्वापदे आमचा क्षणाक्षणाला
गळा घोटत असतांना
आम्ही का कवटाळीत बसावे

आमच्याच उध्वस्ताला
आमच्या अस्मितेची रोपटी
आता वाढू लागलीत
आम्ही भिरकावून दिलंय
आमच्या उदास रात्रींना
सूर्याच्या किरणांना
हाताशी धरून
आम्ही उलथून टाकणार आहोत
इथला गलथान ढोंगीपणा
तुमच्या कर्मठ कर्मकांडांची
होळी करताना
नवचैतन्याचे वारे वाहू लागलेत
आमचा संघर्ष
हा एका नव्या क्रांतीसाठी
नव्या परिवर्तनासाठी
तुम्ही समजावून घ्या
आमचा संघर्ष अराजक माजवण्यासाठी नव्हे

# वेडी हरिणी

सर्वांगावर अंधार घेऊन
पदरामध्ये तोंड लपवते
वेशीमधल्या दगडावरती
वेडी हरिणी उगाच हसते

तटाटलेले पोट तिचे
आभाळावर थुंकत राहते
उभारलेल्या मरणावरती
जितेच मढे जळू लागते

चक्रावतात उसासे
धमन्यांच्या चालीवर
भोवळतात हुंदके
श्वासांच्या थांब्यावर

पाप कुणाचे शाप कुणाला
तिचेच तिला कळत नसते
वेशीमधल्या अंधाराला
वेडी हरिणी ठाऊक असते.

●

# जळण

विझलेल्या जाळाचे
फुंकणारे डोळे धुराचे
फाटलेले अंग
सावरासावर—
चुरुचुरु चिरे
फाटके जुन्यार—
तळपायाचे
करपायाचे
रडायाचे खडायाचे
पिचत खचत
सरणामधल्या लाकडामध्ये
असेच जळायचे......!

●

## जात

हिंदोळलेल्या पापण्या
दुखऱ्या घाटावर
वेदनांची जत्रा भरवतात—
काळोखाला चिरत
विद्रोहाचे सूर ऐकू येतात

१

त्या अंधारी रात्री
आवळल्या होत्या चिमुकल्या मुठी
माधव बामण किंचाळला होता
'महारड्याला हाकला इथून'
शहारलेल्या मनामध्ये
आकाश थोडं वाकलं होतं
डोळ्यांच्या डोहामध्ये
चिंब भिजून गेलं होतं

२

सुध्या पाटील
सूर्यप्रकाशात चिडवीत होता—
'महारड्याजवळ बसू नकोस'
खिः खिः करीत कुलकर्णी मास्तर
पुन्हा पुन्हा बजावीत होते
'शाळेमध्ये येऊ नकोस'
पूर मोठा येऊन जातो
सूर्य डोळ्यात शिरतो
धमन्या पेटू लागतात
उंचवतात हात—
—सुध्याच्या डोक्याचे लाल लाल रक्त
पाटील सिशांना पीळ देतो
आणि कडाडतो चाबुक अंगावर
'आई ग ऽऽ' किंचाळलेली हाक
फाडून टाकते आसमंताला
काळवंडलेल्या दिशा
भेलकांडत ऊर बडवतात

३

टिपूर चांद्ण्यात
विमल जोशीच्या मिठीमध्ये
साकळून जाते रात्र
समुद्राच्या लाटावरती
नाचत येतात स्वप्नं
माळलेला मोगरा तिचा मोहरून जातो
अवखळ डोळे गालावर लाली चढवतात
लाट फुटते मधाची, ओठ सारे पिऊन घेतात
शब्दांमध्ये वारा भरतो. गात्रांना नशा येते
लग्नावरती गोष्टी येतात
विमल जोशी नखऱ्यामध्ये बोट फिरवीत वाळूमध्ये
हळूच म्हणते, 'जात तुमची काय गडे?'

घाम फुटतो अंगाला
वणवा भिडतो मनाला
भळभळणाऱ्या जखमेला रक्ताची आठवण येते
वाळू थोडी सरकू लागते-सांगून जाते माझी जात
मिठी तिची सुटून जाते, तरतर उठून जाऊ लागते
जाता जाता सांगून जाते 'परत कधी भेटू नकोस
आपलं कुणा सांगू नकोस'
गंध सारा सुकून जातो भिरभिरणारा पाचोळाही
एक झंझावात बनतो !

●

## घुसमट

डफावर टिपरू पडल्यावर
बैलांनी उधळावं, धावावं, उसासावं
घाबऱ्या घुबऱ्या जिवाचा आटापिटा करून
घाट चढावा
तसाच मी ही
भुकेलेले आवाज ऐकून
झाडतोय अंगावरचा घाम
ही उधळण, धावणं, उसासणं
घाबरणं, घाट चढणं...
असंच...असंच चालणार का ?

## सावधान

तुमच्या सनातनी परंपरेवर
मी जर थुंकलो
तर तुम्हाला राग का यावा ?
शतकानुशतके माझ्या अस्तित्वाचे
गावकुसाबाहेर धिंडवडे काढताना
कोणत्या वाण्याजवळ गहाण ठेवला होता
तुमच्या माणुसकीचा गहिवर
सडलेल्या मनाचं रेशनिंग
पोथ्यापुराणात वाटताना
बहुचक नियंत्रणाचा बोजवारा केलात
आज माझ्या अस्मितेला
नाकं मुरडता
माझे अस्तित्व अमान्य करताना
टिन्या बडवीत दवंडी पिटता
बेट्यांनो,
अजूनही तुमच्या चित्रातले रंग न्याहळा
नाहीतर माझ्यातल्या माणसाला ते फाडावे लागेल !

## उध्वस्त

माझ्या उध्वस्त स्वप्नांना
डकवले कितींदा तरी
त्यांनी आवर्जून सांगितले
'आम्हाला क्रूसावरच लटकायचंय'–
आमच्या हातापायात, डोक्यात
शरीराच्या प्रत्येक अवयवात
आरपार खिळे मारून चिंधड्या करा
बलिदानानेच सुखावतील
आमचे बंडखोर आत्मे
उदास प्रेषिताने सोडलेल्या सर्पदंशी
प्रश्नांनी
घायाळ झालेला मी
शोधतोय
माझं बेघर अस्तित्व !

●

## तुम्ही

सर्कशीतल्या माणसाप्रमाणे
मरणाचा तोल सांभाळत
खाली-वर, उभे-आडवे
उन्हाचे कवडसे सरकावे तसे
तुम्हीही सरकता घामेजलेल्या अंगाने
आकाशाशी नातं सांगणाऱ्या....ह्या उंच सापळ्यात
स्वतःचा जीव लोटून जीव भरता
हेच म्हणे 'ऑबेराय-शेरेटन' हॉटेल होणार
साज, शृंगार, मादक संगिताचा थयथयाट
गुलाबी इशारे, मुलायम संकेत,
आलिशान कोरीव नक्षी, बड्या बड्यांची वहिवाट
पाऊस पडावा तसा पडेल पैसा
हे सारं काही खरं आहे, माझ्या बाबांनो
यातलं तुमच्या वाट्यास काही येणार आहे का रे?
की
तुम्ही फक्त घाम गाळीत, रक्त शिंपीत
म्हणायचीत मरणावरची गाणी :

●

## यशोधरेस —

यशोधरे !
तुझ्या भिजलेल्या डोळ्यात
बघतो मी जगाला संदेश देणारा भगवान बुद्ध
तुझी एक छोटीशी जीवनरेषा
विजेचा गदारोळ होऊन कडाडते
त्या दैदिप्यमान प्रकाशात
इतिहासाने गोडवलेल्या सीता, सावित्र्या
बनतात पाला पाचोळा !
जोपासलेस खंदकातल्या सुरुंगांना
झेललेस आकाशातल्या उल्कांना
वीरांगने !

तुफान बनून लढलीस तुफानांशी
वेदनांना कुरवाळीत बहाल केलास जगाला
जीवन-मृत्युचं रहस्य सांगणरा एक महापुरुष
हुंदक्यांना दाबले नसतेस
श्वासांना पेरले असतेस
आणि
काढला असतास भावनांचा जाहीरनामा
तर जग उरलेच नसते जगासाठी
दिसले नसते तथागत
म्हणता आलेच नसते
'बुध्दं शरणं गच्छामी—'!

●

## गर्भ

वेदनांनो,
शतकानुशतके
जिरवले तुमचे गर्भ-तुमच्याच पोटात
लाथाबुक्क्यांचा मार
अंगावरचे वळ घेऊन
ऊर फुटेपर्यंत तळागाळात हंबरलात
न्याय दिला तुम्हाला वांझोटीच्या वांझपणाचा
हाटा-हाटातून मिरवला तुमचा नागवा देह
भडकलेला अंगार घेऊन
जेव्हा पेटलात
तुमच्या हातातील पेटलेल्या मशालीत
त्यांना दिसला तुमचा वाढणारा गर्भ
तुमच्या पोटी
जन्माला येणाऱ्या सूर्याच्या किरणांना
प्रसन्न करण्यासाठी
काळवंडलेले तपस्वी
आता मठामठातून तपास बसू लागलेत.

चंद्रा सरणावर जळताना
मध्येच उठून उभी राहिलीस
असह्य, केविलवाणा टाहो फोडलास
तुझ्या त्या किंकाळ्यांनी
स्मशानातील भुतेही कासावीस झाली असतील
तुझी अब्रु, लुटता ना
अशीच हंबरलीस—
झाशीच्या राणीसारखी परजलीस
गावातील गुंडांनी लुटताना
छाती बडवीत मदतीची झोळी पसरलीस
कान डोळ्यांवर हात ठेवणारं
भोवतालचं जग निघालं षंढ
तशात गाव कुसाबाहेरची तू....

सारंच सहन करण्यासाठी जन्माला आलेली
तुझ्या लग्नाच्या वरातीत
तुला एकदाच हसताना पाहिलं
नंतर तू दिसलीस क्रुसावर लटकलेल्या येशूसारखी
संसाराच्या गाड्यास जुंपलीस
पोरासोरांच्या भुकेसाठी राबत राहिलीस
तुला पाहिलं बटाटे निवडताना, शेंगा तोडताना,
खुरपणी, वेटाळणी करताना
काबाडकष्टातच तू विसरून गेलीस तुझ्या
साजऱ्या गोजऱ्या रूपाचं अस्तित्व.
ज्यावर डंख धरला होता
इथल्या विषारी भुजंगांनी
चंद्रा !

तू ठरलीस ह्या विसाव्या शतकातील
वासनाकांडाची भोगवस्तू—
गवई बंधूंच्या डोळ्यातील वेदना—
किलावेनमानातील भयंकर रात्र—
ब्राह्मणगावातील नागवी यात्रा—
नारनवरेचा तडफणारा प्राण—
भागवत जाधवच्या मेंदूचा चेंदामेंदा !
विहिरीला जवळ करून दाखवून दिलंस ह्या—
हलकट संस्कृतीला
गरीबालाही असते जिवापेक्षा अब्रूचं मोल,
तुझी ही आत्महत्या नसून
सनातन परंपरेने केलेला खूनच म्हणावा लागेल
चंद्रा !
ह्या साऱ्याचा शेवट तरी कधी होणार ?
का असंच चालणार पुढंही ?

सारंगी वाजवणारे नीरो—
तर साला सगळेच म्युझियममधले पुतळे बनलेत
तुझ्या छाप्यातील बातमीने
कदाचित त्यांना जाग येईल
तिथल्या हिरवळीवर गटागटाने सभा भरवतील
तेवढ्या क्षणापुरतेच टमाट्यासारखे
लाल लाल होऊन गरजतील
निषेधाचे ठराव फडफडतील
दुसऱ्या चंद्रावर बलात्कार होईपर्यंत सारं कसं थंड थंड
जाऊदे चंद्रा-हे असंच चालत राहणार
तू मात्र लक्षात ठेव तुला परत कधी जन्म घ्यायचा झाल्यास
माणूस म्हणून जगता येईल अशा जगातच जन्म घे
परंतु
इकडे चुकूनही फिरकू नकोस !!

●

# सूर्य गहाण पडलाय

वाटलं होतं उजाडेल
काळोखलेल्या दिशा
मातम करण्याचं सोडून
त्यांच्या गंधगर्भ
स्वप्नांना प्रसवतील...
प्रकाशाची धून घेऊन
बंद केलेले पाखरांचे थवे
स्वैरपणे गीत गात
आकाशभर संचारतील—
तसं काहीच घडत नाही
घुबडांचे घुत्कार मात्र
रोजच वाढताहेत
संस्कृतीच्या ठेकेदारांकडे
गहाण पडलेला सूर्य
सोडविण्यासाठी
अजून किती युगे
गाडावी लागतील ?

विजेच्या लोळाने मेदरलेलं क्षितीज
भांबावून जातं
ढगाच्या ढोलीतून उडालेली पाखरं जमिनीवर कोसळतात
सूर्यांची किरणं ऊर बडवू लागतात
जातं दळता दळता म्हातारी गात असते
असंच....काहीतरी...हृदय पिळवटणारं....
केविलवाणं—असह्य
फाटलेल्या छप्पराचं-बेवारशी प्रेताचं
सडलेल्या बोटांचं-रिकाम्या पोटांचं
डोळ्यांच्या खाचांचं
दगडाला वाहिलेल्या रक्ताचं
गळणाऱ्या घामाचं-लुटलेल्या अब्रुचं
दुबळ्या जिवांचं-कण्हलेल्या मरणाचं
ऐकवत नसेल तर कान लिपा
बघवत नसेल तर पापण्या डिकवा
म्हातारी आपली गातच आहे
जातं तिचं दळतंच आहे!

## येऊ नकोस पुन्हा—

मागावयाचे होते मागू नकोस पुन्हा
आकाश कोरण्याचा नको करूस गुन्हा ॥
माझ्याच चांदण्यांना इथे नसे निवारा
तुझ्या धुंद क्षणांना ठेवू कसा पहारा
धुळीत लोळण्याला येऊ नकोस पुन्हा ॥
डोळ्यात मिरविल्या अंधाराच्या वाटा
उरात साठविल्या काळ्या ढगांच्या लाटा
तो खेळ बाहुल्यांचा खेळू नकोस पुन्हा ॥
मी गायिल्या स्वरांना तू गोंजारू नको ग
क्षितीज माझे मजला तू डोकवू नको ग
त्या बंद पापण्यांनी चालू नकोस पुन्हा ॥
आंधळ्या पारध्याला शिकार का मिळावी
वाळल्या कळीला फुलात का बघावी
त्या तुटत्या पतंगा उडवू नकोस पुन्हा ॥

●

# होरपळणारी वस्ती

तुम्ही या बाजूला फिरकाल जेव्हा--
दिसेल तुम्हाला स्मशानाचा मुखवटा घेऊन
होरपळणारी ही वस्ती—
जीव जाणाऱ्या माणसासारखी
इथली घरे दचकत असतात
घडी घडीला--
मेलेल्या जनावरांचे घारी गिधाडांनी लचके तोडावेत
तशी इथली जिवंत माणसे
रात्रंदिवस कुरतडली जातात
जादूची कांडी फिरावी तशी
आपोआप घरे पेटली जातात
दिवसा ढवळ्या बाया बापड्यांच्या कासोट्यांशी
लुबलुबीत वासनांचे दुर्योधनी हात
झोंबत असतात.

प्रतिकार करणाऱ्या एकलव्यांचे
अंगठे तोडले जातात--
डोळे फोडले जातात--
आडरानात कपटाने मारले जातात
त्यांच्या खुनांना पुरावाच मिळत नाही
इथल्या झाडाझुडुपांना, दगड धोंड्यांना,
पायवाटांना
विचारा तुम्ही
यांनी मरणाशीच सौदा केलाय
जीवन त्यांना दिसलेच नाही
तुम्ही या बाजूला फिरकाल जेव्हा
दिसेल तुम्हाला स्मशानाचा
मुखवटा घेऊन
होरपळणारी ही वस्ती !

●

# ठिगळ

खराट्याच्या कचऱ्यासारखा
फरपटत रस्त्यात अवघडलेला मी
काळजावरचं गोंदण पुन्हा पुन्हा चाचपडतो
मळभलेल्या ढगातून एकेक थेंब....
सारं आयुष्यच सादाळून टाकतो
उराशी धरलेली पहाट
धुक्यात हरवते
अन् सये ! सकाळची कोवळी किरणे घेऊन
तूही येतेस निष्पर्ण या झाडीत
इथे बारा महिने शिशिर
तुझ्या केसात गजरा तरी कसा माळू ?
ओहोटीच्या समुद्राला डोळ्यात साठवून
अशी दचकू नकोस घसरणाऱ्या वाळूला-
दुपारच्या कडक उन्हात
दंड भरताना तुझ्या जुन्याराला
सये ! तू ही चकावशील
माझ्या शर्टाच्या ठिगळाला

●

# पैलतीरावरील शिरपा

टिनोपाल कपड्यातील मला पाहून
माझा दोस्त शिरपा
टि-या झाकण्यासाठी
बांधू लागतो धोतराच्या अंधाराला
त्याच्या बायकोला
चिंध्यावर पांघरूण घातल्यावर
आकाश झाकल्यासारखं वाटतं
त्यांना मी कुणीतरी मोठा साहेब वाटतो
कशा दिसणार त्यांना माझ्या
उघड्या असणाऱ्या टिऱ्या
किंवा लोंबत असणाऱ्या चिंध्या
अरे शिरपा, मला तुझ्याशी खूप बोलायचंय
बेंबीच्या देठापासून खूप हसायचंय

चिमण्या आठवणीत झोकून द्यायचंय
परंतु तू पैलतीरावर उभा असल्यासारखा
का वागतोस ?
तुझं बोलणं, हसणं, वागणं
सारं काही परक्यासारखं वाटू लागलंय

तुला का मी कुणा
वाण्या बामणाचा वाटलो ?
नाही रे दोस्ता
असं काही समजू नकोस
मी तोच आहे
तुझ्या चखोंड भाकरीचा अर्धा तुकडा
गटागट गिळणारा भिवा !

## हे थांबवायला हवं—

मी पाहिलं आहे
इंद्रधनुष्याने सजवलेला
रंगी बेरंगी भडव्यांचा महाल
गजबजलेल्या बाजारपेठात
बाजार बुणग्यांची उलाढाल
अंतस्थ गुदामात भरलेलं म्युझियम
कॅब्रेवर जीव ओवाळणारे
पॉलीश केलेले खिसे
ब्ल्यू फिल्म गिळणारे आध्यात्मिक डोळे
वातानुकूल कुपीत घोट घेणारे गळे
लपून छपून शेज सजवणाऱ्या
सीता-सावित्र्या —

तुम्ही आम्ही घाम गाळणारे
पावाच्या तुकड्यासाठी भणंग
उद्याच्या काळजीने चिरणारे
मरणाला डोळ्यासमोर ठेवून
भविष्याचे नकाशे तयार करणारे
हातापायाच्या बेड्यांनी वाकलेलो
गळ्यातील कर्जाच्या फासाने खचलेलो
सारं विसरण्यासाठी
गुत्त्यामध्ये झिंगलेलो
दोस्तांनो !
न चुकणारं मरण जगण्यासाठी
आपण आपली आत्महत्या
थांबवायला हवी !

●

आयुष्याचं पाल घेऊन
तुला उतरायचंच असेल वस्तीला
उदास रात्रींना बोटं मोडीत, कुरवाळू नकोस
माझ्या उध्वस्ताला.
मी सागराला उराशी धरून
उद्याच्या सूर्याची वाट बघतो आहे
तू अशी जुने संदर्भ जुळवीत, ढगाना फोडीत
सांडू नकोस निखळणाऱ्या उल्कांना !
तुला सोनेरी किरणात भिजायचंय ना ?
मग आपले कफन आपणच बांधायला शिकायला हवं
असलं हे किडामुंगीसारखं अस्तित्व नाकारणारं जिणं
मला नामंजूर आहे .
अजूनही विचार कर
तुझ्या मुलायम स्वप्नाजवळ
तुला घुटमळायचं असेल
तर माझ्या वस्तीतून चालती हो
.......मला जगायचंय !

# शोध

आवर्तांत तरंगणारे माझे भास आभास
गुदमरलेल्या श्वासांची निळीभोर स्वप्नं
रक्ताळत फाटत जातात
रोजच्याच वेदनांना जपावं तरी किती?
मोडक्या तोडक्या संसाराचा
उगवणारा दिवस ढासळत जातो
वैफल्याच्या संक्रमणातील हरेक रात्र
काळोखात बुडून जाते
पापण्यांना मुठीत झाकीत जागावं तरी कसं?
मरणाचा रवंथ म्हणजे जीवनाची प्रक्रिया असावी का?
काडी लावाविशी वाटते
माझ्यातल्या दुबळेपणाला
आणि भडकावून द्यावासा वाटतो
माझ्या अस्मितेचा – आगीचा डोंब
मला विश्वास आहे माझ्या आगंतुक पायाना
शोध लागेल केव्हातरी
प्रस्थापित वाटेचा

●

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
22998
दा. क्र. काव्य 2339

हे नाटक मला जमणार नाही
माझ्या तोंडावरचा रंग पुसून टाका
काळ्या लाटांनी ऊर कसा भरून गेलाय्
रस्त्याला पडलेल्या भेगा
माझं चांदणं झुरतंय उन्हात
पत्यच्यां बंगल्याचा
राजा मला बनवू नका
या वातानुकूल तुरुंगात
मी गुदमरून गेलोय
सन्मायकी दरवाजे
रंगी- बेरंगी रोशनी
कोच, खुर्च्या- टेबल
उन्मत नागवी
साऱ्या अवयवांची
प्रदर्शन करणारी कॅबरे
या साऱ्यांच्याच भोवती
भिरभिरतोय माझ्या झोपडीतला पाचोळा

तळलेल्या मुर्गीच्या घासाला
लागतो चिऊ- माऊचा ठसका
या पेल्यात भरलंय्
माझ्या मजुरांचं रक्त
तेवढ्यातरी पापाचा वाटेकरी
मला बनवू नका रे
माझ्या तोंडाला पेला लावू नका
कानातले भयंकर आवाज
रस्त्यावरची नागवी मिरवणुक
ढण्-ढण् जळणारी आग
लाल लाल रक्ताचे कारंजे उडू लागलेत
फटाक्यासारख्या सरणावरच्या कवट्या
फटा- फट फुटू लागल्यात
माझ्या उरातलं माझं मढं
मला दडपू लागलंय मला बाहेर सोडा रे
मला हे नाटक जमणार नाही
माझ्या तोंडावरचा रंग पुसून टाका

●

## स्वीकार !

माझे 'मी' पण खतम झाले तरी चालेल
ठणकणाऱ्या ठणकांनी
लुब्रे सलाम ठोकू नयेत
का चोंभाळीत बसावे
इथले हजारो वर्षांचे संकेत ?
धमन्यातील रक्ताच्या ठिणग्यांनी
जाळून खाक करावी इथल्या संस्कृतीची
ह्या देशाच्या इतिहासाच्या पुस्तकात
पानापानांवर आहेत
माझ्या बलिदानाच्या रक्तखुणा
अत्याचाराची नागवी चित्रे
कुणाच्या थुलथुलीत सहानुभूतीने
मी आंधळा का होणार आहे ?

मी पचवून बसलोय
इथले दांभिक कोलाहल
नपुंसक सप्ताहांची नाटकं
भडकणाऱ्या वणव्यात
माझ्या संवेदना
चाकू सुऱ्या सारख्या
तीक्ष्ण झाल्या आहेत
उसळणाऱ्या उर्मीचे
आव्हान स्विकारीत
माझे प्रगल्भ हात
अंधाराशी भिडले आहेत !

●

'सागरा प्राण तळमळला—

अस्ताव्यस्त खुराड्यासारख्या
पसरलेल्या झोपडीतील खुजी माणसं
पंधरा ऑगस्टचा आनंदोत्सव साजरा करतात
बुध्दविहारासमोर रांगोळीने काढलेला भारताचा नकाशा
लटकलेल्या पताकांच्या लांबच लांब रांगा
'ने मजशी ने परत मातृभूमीला
सागरा प्राण तळमळला, '....
लाऊडस्पिकरच्या आवाजाने
भारावून जाते झोपडी झोपडी
झेंडावंदन करण्यासाठी
भराभर माणसे गोळा होतात
'पळा रे पळा, पकडा साल्यांना
महारडे खूप माजले आता'
पंधरा ऑगस्ट साजरा करतात,
एकाएकाची डोकी फोडा
पेकटात लाथा मारून
आतडी बाहेर काढा–'

उगवत्या सूर्याला साक्ष ठेऊन
बरसतात लाठ्या काठ्या
फुलांचा सडा पडावा तशी
टपाटप माणसे कोसळू लागतात
कुणाची डोकी फुटतात
तर कुणाच्या बरगड्या तुटतात—
विव्हळणाऱ्या आर्त स्वरांनी
स्वातंत्र्यदिन किती किती छान साजरा झाला.
हे देशा !
तुझ्या स्वातंत्र्याचे गुणगानही
आम्हाला गाता येऊ नये का रे ?
लाऊडस्पिकरचा आवाज बंद झालाय
'ने मजशी ने परत मातृभूमीला
सागरा प्राण तळमळला'
आत्ता ऐकू येत नाही
हे सागरा ! आमच्या स्वातंत्र्याला
कधी घेऊन येशील रे
का असेच तळमळत ठेवणार आहेस
आमचे लाखो प्राण ?

●

मृत्युपत्र लिहिणाऱ्या माणसासारखा
मी अंतर्मुख होऊन विचार करतोय
मला कधीच का दिसू नये
ह्या सृष्टीच्या रंगाची उधळण
मोहरलेल्या प्रकाशाची झुंड
तुषारांची शुभ्र झूल
वृक्षवेलींच्या फुलांनी सजलेली अरण्ये
भिरभिरणाऱ्या पंखाची लय
बरसणाऱ्या गंधाची धुंदी
पाना-फुलांनी डवरलेली झाडे
मला ओसाड माळरानासारखी
निर्विकार का दिसू लागतात?

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
229378
क्र. 2339
REFBK-0022114
REFBK-0022114

दुधाळ चांदण्यारात्री
गंधात न्हात असतात म्हणतात
मी तर हरएक रात्र भोगतोय
करपलेल्या भातासारखी
माझ्या अंगणात प्राजक्ताचा सडा कधीच पडला नाही
तिच्या गालावरच्या गोड खळीचा
अर्थ सजवीन म्हटलं—
तेही जमलं नाही
निसर्गाच्या वस्तुजातीशी
फारकत घेतलेला मी
नोंदवलेल्या दंशांनी
ठाम बहिरा आंधळा झालोय
किर्र झालेल्या माझ्या रक्तात
लहडलेल्या प्राणाच्या फांदीफांदीवर
फडफडतात फक्त
विद्रोहाचे श्वास !

●